म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
ग्रं. क्र. ८८४

म. ग्र.
विषय ग्राम
नं. ८८४

# स्य काव्य.

(दुसरी आवृत्ति.)



REFBK-0004256
REFBK-0004256

वि. कृ. नेरूरकर, बी. ए.

श्री

# राधाकृष्ण-रहस्य.

कवि,

विठ्ठल कृष्ण नेरूरकर, बी. ए.

REFBK-0004256
REFBK-0004256

प्रकाशक,
यशवंत राजाराम ठाकूर, बी. ए; एल्एल् बी. बेळगांव.

बेळगांव, सन १९३०.

किंमत ५ आणे.

मुद्रक :–

क. रा. आंबेवाडी यांनीं डी. आर. ठाकूर यांचेकरितां तरुण भारत
छापखाना बेळगांव येथें छापिलें.

# अर्पणपत्रिका.

लहानपणचे खेळ खेळतांना देखील सहाणेवरचें गंधाचें खोड अथवा एकादा सुळसुळीत काळा दगड हातांत घेतला असतां जिनें मला " तो तुझा कृष्णदेव बरं, त्याची पूजा कर हं! " असें सांगावें; शाळेंतून घरीं आल्यावर जिनें मजकडून हरिविजय, पांडवप्रताप अशा पोथ्या वाचून घ्याव्यात, रात्रौ निजतांना कहाण्या सांगण्यासाठीं मी हट्ट घेतला असतां जिनें भक्तविजयांतल्याच कथा सांगाव्यात; एवंच लहानपणींच जिनें माझें मन परमेश्वरभक्तीकडे वळविलें अशा मातामहीतुल्य मला परमपूज्य व दिवंगत वैकुंठवासी पुण्यशील व्यक्तीला हें माझें पहिलेंच काव्य अर्पण करीत आहे.

**पुस्तककर्ता.**

# याच ग्रंथकाराचीं इतर पुस्तकें—

| | | | |
|---|---|---|---|
| १ | कवीची भेट (काव्य) | ... | ०—६—० |
| २ | टॉलस्टॉयचें तत्वज्ञान | .... | ०—६—० |
| ३ | देशाचें वैभव (कादंबरी) | .... | ०—६—० |
| ४ | सिंहगड दर्शन (काव्य) × | .... | ०—३—० |
| ५ | पर्वती (काव्य) | ... | ०—३—० |
| ६ | दुधारी सुरी (कादंबरी) | .... | १—८—० |
| ७ | तो क्षण (कादंबरी) | .... | ०—१२—० |
| ८ | उत्कर्ष सोपान | .... | ०—६—० |
| ९ | मराठीचा संसार | .... | १—०—० |
| १० | अकबराचें वेदसाधन | .... | छापत आहे. |

यापैकीं १ ते ७ हीं पुस्तकें—

१ तरुण भारत प्रेस, बेळगांव.

२ प्रमोद ऑफिस, सावंतवाडी.

३ बॉंबे बुकडेपो, गिरगांव मुंबई.

४ परचुरे पुराणिक मंडळी माधवबाग मुंबई.

ना. गो. राजिवडेकर बुधवार पुणें येथें व नं. ८ चें. पुस्तक मॅ. किर्लोस्कर, किर्लोस्करवाडी (सातारा)

नं. ९ चें पुस्तक मॅ. इचलकरंजी ग्रंथमाला पुणें येथें व नं. १० पुस्तक मॅ. चित्रशाळा पुणें येथें मिळेल

× या काव्याची दुसरी आवृत्ति श्रीरामतत्वप्रकाश छापखाना, बेळगांव येथें श्री. दत्ताजीराव आबाजीराव सावंत हे दुसऱ्या आवृत्तीच्या हक्कानें छापीत आहेत.

# वाचकांच्या कानांत.

आपल्या धर्माची प्रतिष्ठा वाढविण्यासाठीं दुसऱ्याच्या धर्माची कुचेष्टा करण्याच्या निंद्य साधनाचा अवलंब करणारे खिस्ती मिशनरी आणि आपल्या दुर्वर्तनावर पांघरूण घालून टोंचणाऱ्या मनोवेदनेची तीव्रता कमी करण्यासाठीं योगेश्वर कृष्णाच्या योगमायेचा आणि गूढ लीलेचा विपर्यास करून राधा आणि कृष्ण यांच्या पवित्र—आराधक आराध्य, साधक—साध्य, कामुक स्त्री-पुरुष नव्हे—संबंधास हिडिस स्वरूप देणारे स्वधर्म ज्ञानशून्य अविचारी हिंदू यांच्या भ्रममूलक समजुतींत थोडा तरी फरक व्हावा ह्मणून आणि हार्मोनियमवर बसून मनोविनोदन करणाऱ्या संगीतप्रिय व गानलोलुप, तसेंच पुराणपुरुषांचीं, देवांचीं व गौळणींचीं गाणीं ह्मणणाऱ्या भाविक अशा दोन्ही वर्गांतील स्त्रियांस पुराणप्रियतेच्या आणि धर्मसमजुतीच्या बाबतींत त्यांच्या नाजूक मनास धक्का न बसतां गाण्याचा स्वार्थ आणि भक्तीचा परमार्थ साधतां यावा ह्मणून हें काव्य मी लिहिलें आहे.

ह्या माझ्या तृतीय पण रसिकांसमोर येणाऱ्या प्रथम कृतीस दक्षिणा-प्राइझ् कमिटीनें साठ रुपयांचें—नव्हे, रुपयांनीं ज्याची किंमत मोजतां येणार नाहीं अशा उत्तेजनाचें अमूल्य—बक्षीस देऊन मला ऋणी केलें आहे.

हें काव्य लिहून झाल्यावर तें पुढें आणण्याच्या बाबतींत माझे पूज्य गुरुवर्य तात्यासाहेब व दादासाहेब यांनीं मला वेळोवेळीं सूचना करून अनेकप्रकारें उत्तेजन दिलें. पण शिष्यवात्सल्याची वाखाणणी शिष्यानेंच कोणत्या शब्दांनीं करावयाची? त्याचप्रमाणें माझे स्नेही रा. द. स. सावर्डेकर आणि रा. अच्युतराव महाजन यांनीं मला हरतऱ्हेनें सहाय्य केल्याबद्दल त्यांचे आणि रा. नारायणराव केतकर यांनीं पुस्तक मुदतींत प्रसिद्ध केल्याबद्दल त्यांचे आभार मानणें हें माझें कर्तव्यच आहे.

पुस्तककर्ता.

# दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना.

आज जवळ जवळ अकरा वर्षांनंतर या काव्याची ही दुसरी आवृत्ति प्रकाशित करण्याचा योग येत आहे. माझे मित्र बेळगांवचे एक लोकप्रिय वकील श्रीयुत यशवंतराव राजाराम ठाकूर बी. ए. एल एल. बी. यांना हें काव्य आवडून त्यांनीं प्रकाशित करण्याचें कार्य अंगावर घेतलें ह्मणूनच ही दुसरी आवृत्ति रसिकांपुढें आणतां आली. पहिल्या आवृत्तीच्यावेळीं सर्व नियतकालिकांनीं या काव्याची गुणप्रशंसा करून मला उत्तेजित केलें होतें. त्यांचे आभार मानण्याची संधि इतक्या उशिरां आज मिळत आहे. यावेळीं माझे प्रिय गुरुवर्य डॉ. तात्यासाहेब गुणे व प्रि० दादासाहेब पटवर्धन यांची आठवण झाल्याशिवाय कशी राहील?

पुस्तककर्ता, बेळगांव ( ठळकवाडी. )

# अनुक्रमणिका.


| | | |
|---|---|---|
| १ | समुत्कंठिता राधा | १ |
| २ | मुरलीमुग्ध राधा | २ |
| ३ | गृहकार्यरता राधा | ३ |
| ४ | कुंजवनगामिनी राधा | ४ |
| ५ | पथविशंकिता राधा | ५ |
| ६ | संकेतवंचिता राधा | ७ |
| | ( १ ) शिलातलाप्रत | ८ |
| | ( २ ) मालतीलतेस | १० |
| | ( ३ ) कदंबास— | १२ |
| | ( ४ ) कोकिलेस— | १४ |
| | ( ५ ) कालिंदीस— | १५ |
| ७ | वायूशीं— | १७ |
| ८ | तन्मयता | २० |
| | ( १ ) एकीकरण | २० |
| | ( २ ) आत्मार्पण | २० |
| ९ | अंतर्मुखता | २१ |
| १० | अस्पष्टाभास | २१ |
| ११ | आनंदानुभव | २२ |
| १२ | परमानंद | २२ |
| १३ | श्रीकृष्णदर्शन | २३ |

| | | |
|---|---|---|
| १४ | भेट .... .... .... .... | २४ |
| १५ | विज्ञापना .... .... .... .... | २४ |
| १६ | आज्ञापना .... .... .... .... | २५ |
| १७ | अनुमति .... .... .... .... | २६ |
| १८ | उद्बोधन .... .... .... .... | २७ |

ता. २८.२.३१

श्री.

# राधाकृष्ण-रहस्य काव्य.

गंगाप्रवाहजचलज्जलसेकरम्यम्
चन्द्रस्थितिप्रगुणितप्रभमुत्तमांगम् ।
भस्मानुलेपनविधेर्धवलायमान-
मापादमस्तकमहं प्रणतोऽस्मि शम्भुम् ॥१॥

मराठी ग्रंथ संग्रहालय
वा. क्र. ४२५६

## १ समुत्कंठिता राधा.

चाल-( जाऊं कामाला सखेग )

[ राधा यमुनातीरावरून पाणी भरून घेऊन घरीं येत असतां, तिला कृष्णाच्या मुरलीचा नाद ऐकूं येतो. ]

नाद कुठुनि आला । समजलें । नाद मधुर आला । कुठुनि हा ।
नाद मधुर आला । श्रीहरी कुंजवनिं निघाला ॥ धृ० ॥
पाऊल लचके घागर डुचके मम चपल चके भान । कैसें
मुरलिगान जरि कान ऐकिती स्थिर नच राही मान । परि ही १
दोनहि करितें कर जरि वरते घागर धरितें ताठ । मी ही
तरि नच ठरते खस्याळ ही कां पुरवित माझी पाठ । ही कां २
मन चळवळतें लगबग चलतें वरुनिहि गळतें नीर । हालुनी
किति आलें जरि दूर तरि दिसे जवळच जमुना-तीर । तरि दिसे ३
घाईंत घाई तुझि कां बाई ! चुनरी ही धरिसी । अशी कां ?
लते सोडिं गे ! स्त्री खरि असमी मत्सर हा करिसी । खरिच तूं ४
वाट रोजची कशी आजची लांब अशी झाली । बहुतची ?
लघुतेलाही येइ दीर्घता उत्सुकता-कालीं । दीर्घता ५

चाल चालतें तरी लांबते अधिकच घरची वाट ।कशी ही
फिर फिरुनि बघें तरिही मागें जात न जमुनाकांठ । मागें ६
घागर उतरुनि गृहिं मग तेथुनि तशीच जाईन थेट । झडकरि
कुंजवनांतरि मजला बांसरीवाला देइल भेट । बांसरिवाला ७
कांहीं मज कुणि ह्मणोत आलें–आलें श्रीरंगा । सु–संगा
भवभयभंगा ! श्रवणिं ओतिं या तव वाङ्मधु-गंगा । ओतिं या ८

---

## २ मुरली–मुग्ध राधा.

चाल–( राग भैरवी अथवा जिल्हा–ताल–त्रिताल )

[ मुरलीचा नाद ऐकून झालेली राधेची मनःस्थिति. ]

मम मन मधुरस्वन मोहक मंजुल मुरली गुंगवी धृ०

नाद-धुनी जों श्रवणीं शिरली
चित्तवृत्ति तों सर्वहि हरली
नयनिं मुरलिधर-मूर्ती भरली
नीलांबर-छवी १

अहा कन्हैया ! वाजिव मुरली
क्षुधा तृषा मम सारी मुरली
बाह्य जगाची जाणिव नुरली
सुखिं आंदोलवी २

निशिदिनिं अलिसम मम हृत्कमलीं
करि गुंजारव रुंजी घाली
मनोभावना त्यांतची रमली
कैसा मोहवी ! ३

पुनरपि कृष्णा वाजिव मुरली
तदितर सकलहि इच्छा पुरली

मुळिं न कशाची आतां उरली
आशा वैभवीं ४
अंतःकरणोद्यानिं विहरतो
बहुपरि अभिनव लीला करितो
परि अंतीं अंतरा चोरितो
मोठा लाघवी! ५
चित्तचोरट्या! ये वनमाळी
फुलेंच फेंकिन तुझिये भालीं
करपाशीं तुज बांधुनि घालीं
शिक्षा ही नवी! ६

---

## ३ गृहकार्यरता राधा.

चाल–( वाहवा थोर तूं भूपाला. )

[ मुरलीचा नाद ऐकून राधेला श्रीकृष्णाचा ध्यास लागला तरी ती सद्गृहिणी आपलीं गृहकार्यें करूं लागते. ]

वाजिव वाजिव रे मुरली। असाची। वाजिव रे मुरली
कृष्णा। खूण तुझी कळली
गृहकार्यीं परि लक्ष न लागे मम मति अति चळली।
तरी तव वाजिव रे ॥ धृ० ॥
कळे कां वाजविशी मुरली। न चुकविन खूण तुझी ठरली
करोनी गृहकार्यें सगळीं। येईन मग मी वनमाळी
क्षणभर पाहीं वाट कन्हैया! त्याच कदंब-तळीं। कृष्णा १
पाहिजे धार प्रथम पिळिली। वासरें उत्सुक बहु झालीं
जरि न त्यां सोडिन या कालीं। दांवण निखाळिति अपुलाली
गळत दूध भूवरि, कासंडी उलट अहा! धरिली। कृष्णा २

स्वारी बाहेरुनि येतां । संगें न्याहारी करितां
लोणी आवडतें चित्ता । घुसळण घुसळीतें आतां
रिताच डेरा खणखण वाजे ! भूल मला पडली । कृष्णा ३
माणसें मोलाचीं जाती । राबती दिवसभरी शेतीं
न्यहारी हवि हातोहातीं । तशापरि आंबवणासाठीं
दळण मांडितें, उलट सुलट परि पेडें कशिं बसलीं । कृष्णा ४
गृहकृत्यें जीं संसारीं । कधीं तीं सोडि न कुलनारी
लागला विलंब मज भारी । ह्मणोनी गोवर्धनधारी
पाहिजे न मुळिं ती मजवरची ममता तव ढळली । कृष्णा ख़ूण ५

---

## ४ कुंजवनगामिनी राधा.

चाल-( प्रथम विचारी मग अविचारी. )

[ गृहकार्यें आटोपल्यावर राधा कुंजवनाकडे जावयास निघते. ]

उशीर झाला परि गोपाला कोप न मजवरती व्हावा
नादाच्या अनुरोधें राधा येते वाजविं तूं पांवा
वाजे पांवा तन्मधुर रवा ऐकिति हे दोनहि कान
सकल कलकलें बन दुमदुमलें त्यास न परि तेथें स्थान
तव हितवचन-सुरस-मधुपाना
जडतचि रति अतितर या कानां
ते तदितर श्रवतिं न रव नाना
तव हितवचन-सुरस-मधुपाना
शिलातलावरि वाट पहावी शब्द आपुला राखावा
नादाच्या अनुरोधें राधा येते वाजविं तूं पांवा १
रूप चांगलें मनीं रंगलें नयन गुंगले तयावरी
बघति न भोंतीं जगतीं असती वस्तुतती अति रम्य जरी

मम नजर रुचिर तव पदकमलीं
मधु–लोलुप मधुकरिसम रमली
बघि अधिक अधिक तरि नच शमली
मम नजर रुचिर तव पदकमलीं
मालतिवेलीतलीं जमावें तो संकेत न भंगावा
नादाच्या अनुरोधें राधा येते वाजविं तूं पांवा २
श्यामल असतां मूर्ती चित्ता राग सुरंजित मम करिते !
जरि रागांकित मद्हृदयस्थित श्यामच तरि रक्त न दिसते !
झडकरि हरि धरिनचि तव चरणा
पसरुनि पदरा भाकिन करुणा
अविरत पदनतजन–अघहरणा
झडकरि हरि धरिनच तव चरणा
विलंब हो तरि कदंबसंनिध कांहिं काल मार्ग बघावा
नादाच्या अनुरोधें राधा येते वाजविं तूं पांवा ३

---

## ५ पथविशंकिता राधा.

चाल–( कधिं करिती लग्न माझें– )

[ कांहीं अंतर चालून गेल्यावर मुरलीचा नाद ऐकूं येईनासा होतो. त्यामुळें तिला कोणीकडे जावें हें समजत नाहीं. ]

मुरलीचा नाद आतां श्रवणीं कां येइना !
जवळी मी जशी येतसें
अधिक तो दिसे
दूर जातसे
केंवि उमजेना । श्रवणीं कां १

वाट कीं चुकुनियां दुरी
कुणिकडे तरी
भटकतें हरी
तेंहि समजेना। श्रवणीं कां २

हीं इथें वालुकेवरी
ठळक साजिरीं
पाउलें बरीं
उमटलीं नाना। श्रवणीं. ३

तरुवरी चढुनि तोडिल्या
बहुत कोंवळ्या
येथ डाहळ्या
धेनुवत्सांना। श्रवणीं. ४

तोडिलीं कोंवळीं दळें
चिकट रस गळे–
तेथुनी, कळे
मजसि येतानां। श्रवणीं. ५

गोवत्समुखीं पल्लवां
नवनव्या तुवां
दिलें माधवा
धरुनि तयांना। श्रवणीं. ६

सगळ्यांच न वा चघळुनी
दिले टांकुनी
दिसति येथुनी
वृक्षपर्णांनां। श्रवणीं. ७

अंकुरें रहित वल्लरी

दिसति वरिवरी
म्हणुनि खातरी
वाट चुकलें ना। श्रवणीं. ८

## ६ संकेत–वंचिता राधा.

चाल–[ ना छेडो गारी दौंगिरे ]

[ श्रीकृष्णानें मुरलीवादन बंद केलें व आपण लपून राहिला. ]

मी आलें धांवत बावरी हरि येथें ना दिसे। मजसि हरि येथें धृ०
संकेत आपणचि करुनी
गेलासि कुठें मज त्यजुनी
आलासिच कीं नच अजुनी मज ना तेंही कळतसें। मजसि १
मी अतांच येतां दुरुनी
मुरलिगान मंजुल श्रवणीं
ऐकिलें इथें कुंजवनीं झालें कोठें नाहिसें। मजसि हरि २
धांवलें मूल आशेनें
भातुकें बघुनि वेगानें
तें उचलुनि नेलें कोणें केलें मजला तूं तसें। मजसि ३
जरि असेल मजला झाला
लव उशीर आगमनाला
तरि का त्या अपराधाला शिक्षा उचिता ही असे? मजसि ४
जो सूर या स्थलीं स्फुरला
पडसाद वनिंवनीं भरला
तो समूळही जरि विरला मन्मनिं उरला हें कसें? मजसि ५
हे कोकिळ-मैना-रावे
किलाकिलाट ज्यांनिं करावे
ऐकण्या गान तव भावें कूजत कोणीही नसे। मजसि ६

तूं शासन मजसि कराया
त्यासहि कां वंचिसि वायां
कां त्यजिसी हे यदुराया माया पाया पडतसें । मजसि ७
ठाव ना कुठें वेणूचा
माग ना दिसत धेनूचा
मेळा गोपाळ चमूचा लपवुनि कोठें तरि बसे । मजसि ८
जीविंच्या जिवा मत्प्राणा !
तुज शोधुं कुठें या स्थाना
येथील सकलही नाना वस्तुंस आतां पुसतसें । मजसि ९

---

## ( १ ) शिलातलाप्रत-

( चाल-चंद्रकांत राजाची कन्या )

[ ठरलेल्या स्थलीं श्रीकृष्ण न दिसल्यामुळें राधा त्याला शोधूं लागते. ती प्रथम शिलातलाप्रत विचारते. ]

सांग शिले ! तुज विचारितें गे कृष्णसखा कोठें ?
त्याचें तूं प्रिय आसन बनलिस भाग्य तुझें मोठें ?
तव अंकावरि सदा विहरतो फिरतो तुजभंवती
पूर्वजन्मिंच्या त्वत्पुण्याची वानुं किती महती !
त्याच्या मागें जासि न तूं गे तोच तुझ्याजवळी
सांजसकाळीं बसतां उठतां तुजला कुरवाळी
त्याच्यासाठीं आटाआटी कितितरि करितें मी
घिरट्या घालित फिरतें मिळतो तरि नच मज नेमीं
सर्वस्वाचा अहेर केला यापूर्वींच त्याला
न कळे कोठें उणें अझुनिही पडतें प्रेमाला

शाब्दिक प्रेमा जगतीं तीनहि काळीं बोकाळे
स्वार्थपरायणता मनिं असतां केवळ ते चाळे
स्वार्थाला जणुं लावुनि टाळें मी बाहिर आलें
पाठ शिकाया निजांतरींच्या प्रेमाच्या शाळे
ज्यावरि करणें प्रेम तयाच्या जीवनिं मिसळावें
भिन्नत्वाला सोडुनि, जोडुनि एक जीव व्हावें
करोत लक्षण कधीं कसेंही कोठेंही कोण
दोन जिवांची एकजीवता प्रेमाची खूण
कृष्ण सख्याशीं या राधेचा एकजीव झाला
भिन्नभाव गे पूर्वींच माझा गळुनीयां गेला
असें असोनी तयें करावी अशि कां कुचराई
इंगित यांतिल मजला बाई कळत नाहिं कांहीं
हृदय उघडुनी माझें पाहीं सांगें लवलाहीं
अतांच होता नंदतनय तो आला कीं नाहीं ?

× × ×

मघांपासुनी कितीतरी मी विनवियलें तुजसी
मौनचि धरिसी शब्द न बोलसि एकहि कां मजसी ?
अतां समजलें, खुळी किती मी ! व्यर्थ–व्यर्थ फसलें
कसें बरें पाषाण हृदय तव द्रवेल हें असलें ?
मम जीवींचा कृष्ण जिव्हाळा कनवाळू, त्याला
संग बाधला, तव सहवासें निष्ठुर तो झाला !
नको नको तव मुखावलोकन, ही मालतिवेल
कृष्णसख्याची वार्ता मजला सत्वर सांगेल

## ( २ ) मालती लतेस–

चाल–( नृपममता रामावरती )

[ शिलातल बोलत नाहीं ह्मणून ती मालती लतेला विचारते. ]

मालती लते मज सांगें
कृष्ण इथें आला का गे । आज तो
मज वचन दिलें ना त्यानें ?
या स्थलीं उभयतां येणें । साक्ष तूं
तो वचनभंग कीं केला
येउनि कीं कोठें लपला । जाणसी
मी मात्र शब्द पाळीला
चहुंकडे तोच शोधीला । तूं पहा
कधिं तरी पुनरपी जरी उगा श्रीहरी
आळ घेईल
मजवरी बोल ठेवील । सांगतें
सांगतें कशास्तव तूतें
तिसऱ्याचें कारण येथें । कोणतें ?
एकदा तया ओळखिलें
विश्वाशीं कृष्णा तुळिलें । मी मनीं
‘ तत् ’ त्वीं हें ‘ मम ’ त्व विरलें
माझें मग आतां उरलें । काय गे ?
ओळखे जगा जो सखे । सकल ठाउकें
असुनिही मग तो
कां अंत असा मम बघतो । नेणवे !
नेणवे जाइ तो कोठें
त्यासाठीं मन तळमळतें । हें सदा

वा-क्रं- CC-6

बैसतां शिलातलिं, त्याचे–
शिरिं धरिसि आत्मदेहाचें । छत्र तूं
आधार सकल विश्वाचा
आसरा तुझ्या छायेचा । घेइ तो
सावली स्वदेहें धरिली
कुरवंडी काया केली । त्यावरी
हीं फुलें बघुनि मन भुले करुनि तूं खुलें
स्वभांडाराला
पुष्पांनीं अभिषेकीला । कृष्ण गे
हृत्पुष्प एक हें त्यासी
पाहिल्याच गडे भेटीसी । वाहिलें
उरलें न अतां मजपाशीं
द्यावया दुजें दरदिवशीं । नवनवें
अर्पिलें, तयें स्वीकरिलें
सुप्रसन्न तन्मन झालें । वाटलें
आतांच इतुकिया कालें
बिघडाया कारण झालें । कोणतें ?
तुज लते किती विनवितें शीर नमवितें
करीं या काजा
व्रजनायक कोठें माझा । सांग कीं

× × ×

अझुनिही न कां तूं वदसी
स्वसुखींच परायण होसी । मज कळे
ह्या तमालतरु-भुजपाशीं
आपणा समावुनि घेसी । देखिलें

मम एकहि वच नायकिलें
मी अरण्यरोदन केलें । तुज पुढें
स्वसुखें संतोषित-वृत्ती
पर दुःखें शीतल जगती । विसरलें !
मी दिला त्रास हा तुला क्षमा करिं मला
लुटीं गे रंग
घे असाच तूं प्रियसंग । चाललें

---

## (३) कदंबास–

चाल--( भूपती खरे ते )

[ मालती लता उत्तर देत नाहीं असें पाहून ती कदंब वृक्षाला विचारते. ]

वद अतां तूं तरी हे कदंब तरुराया!
आला कीं होता कृष्ण आज या ठाया
ठाउकें मला तूं प्रीति तयावर करिसी
स्कंधावरि अपुल्या त्यास सदा खेळविसी
हे स्कंध तुझे रे त्याचपरी हें मूळ
यांवरती दिसते कृष्णपदींची धूळ
मी दीन होउनी करितें रे याचना !
त्वत्स्कांधिं तयें केला रे नाच ना ?
डुलवितोसि मस्तक तूं हें रे साच ना ?
हा येथिल ताजा मोहर वद कुणिं खुडिला
तो कृष्णशिरिंच्या मोरमुकुटिं ना सजला ? १
मालती शिलातल तमाल यांतिल कोणी
मजसवें न वदती मूकवृत्ति घेवोनी
जाईन वाटलें त्यांस परत पाऊलीं

प्रेमाची गमते पारख खास न झाली
ती संकट भीती प्रेमाला नच ठावी
ना निष्क्रियतेला वाव प्रीतिच्या गांवीं
    तें नाजुकही; दुर्गाला भेदितें
    तें सूक्ष्महि; गिरिशिखरांला छेदितें
    सख्यशील; संग्रामाला मांडितें
ब्रह्मांडकटाहा फोडुनियां वावरतें
मिळवितें आपुल्या प्रेमभाजनाला तें २
हा दोन जिवांचा आंतरिक व्यापार
चालतो न कळतां नित अविरत साचार
आनंद होइ जो चिंतनिं ह्या व्यवसायीं
त्यांतही सफलता मानुनियां तें घेई
आत्मीय शोधनासाठिं आपणा वाही
तें न केधवांही स्वस्थ बसुनियां राही
    स्थिर असुनी स्वीकारीतें चालना
    हृदयस्थ असुनिही भेटे प्रियजना
    मूकही; मनींच्या वदतें भावना
त्या वांछित जागीं गेल्याविण नच थारा
तें शुद्धपणें अनिरुद्ध करी संचारा ३

× × × ×

हा वारा तुजला डुलवि, देइ नृत्यासी
तूं स्वमंजरींचा वास तयाला देसी
मम मुखीं कृष्ण–गुणगान–श्रवण जें करिसी
त्यासाठिं अर्पिसी गलित शीर्ण पर्णांसी !
हा मोबदल्याचा न्याय काय बा झाला

कीं व्यवहाराचें ज्ञान मुळीं ना तुजला ?
पक्षपात करिसीं कां रे तरुवरा
घननील कुठें सांगें रे मज जरा
येथील लता-तरु सारे तुह्मि खरा-
—जरि बेतच करितां मजवरती उलटाया
मी तरी विचारिन अतां कोकिलेला या ४

## कोकिलेस—

( चाल-कृष्णा धांवरे लौकरी )

[ मालती लतेची स्तब्धता पाहून ती चालत्या बोलत्या कोकिलेशीं बोलूं लागते. ]

कोकिले सांगे गे तूं आतां मजला एकच वार्ता
अजि कीं पाहिलें व्रजनाथा येथुनि येतां जातां ? १
वायू वाहतसे वासाचा बहार मधुमासाचा
चाले नाच कसा सुमनांचा थाटच कुंजवनाचा २
वरती वितान हें गगनाचें तरुवर खांबच त्याचे
लोंबति घोंस किती कुसुमांचे झालर गमती साचे ३
अपुले उभारुनी कर वरती लतिका तोरण धरिती
करुनी सुमरेणूंची भरती समीर उधळित फिरती ४
गान लकेर तुझी " कूहू " ची साथ तया मधुपांची
नृत्य-कला-कुसरी मोरांची एकच पायावरची ५
मंगल पाठ किती हे ह्मणती द्विजगण त्या नच गणती
निर्झर जयकारा ललकारी निघत कुणाची स्वारी ? ६
पसरे आज कशी भूवरची दौलत देवाघरची
कळलें खूणाचि ही स्वारीची कुंजवनाधिपतीची ७

तुह्मां ठाउक तो इथें असे          ह्मणुनी स्वागत ऐसें
करितां त्याचें गे उल्हासें          मजला मात्र न गवसे ! ८
आतां चोरुनि कां ठेवीसी          सर्व उमगलें मजसी
तूं कां नजर अशी चुकवीसी ?          दुसरीकडेचि बघसी ! ९
सर्वहि सत्य गडे कथिं मातें          पूतनारि तो कोठें
वाटे कौतुक कीं त्या मोठें          दुसऱ्यां देउनि गोते ?

× × × ×

आतां नको तुझें कटुगान          किटले माझे कान
केली स्तुती तुझी बहु छान          होइ तुला अभिमान ११
आहे रीतचि ही गर्वाची          बेपर्वा सर्वांची
गरज न जाणवते दुसऱ्याची          चाड न उपकाराची १२
स्फुरली वेणु इथें जों नाहीं          भिकार गाणें गाई
मी तर सरळ अतां ही पाहीं          यमुनेपाशीं जाईं १६

---

## ( ५ ) कालिंदीस-

चाल-( अजि शेवटचा लाभाचि )

[ शेवटीं कालिंदीला विचारते. ]

तो ब्रिजलाल कुठें कालिंदी मज सांगे
इतकेंच तुजसि गे मागें
हे खग तरु लतिका करुनी नाना सोंगें
मजशीं कुणि बोलति ना गे
कांहे मजवरती फुगती सर्वहि रागें
मैत्रीचे तोडिति धागे
केलें काय तरी मी यांचें तें नुमगे
वस्तुजात कां मज उबगे ?

तीरावरी जें जें कांहीं गे
प्रतिबिंबित तवजलिं होई गे
पुसतें मी एकच बाई गे
मनमोहन जें ब्रम्ह गोकुळीं वागे
प्रतिबिंबित झालें का गे? १
अससी श्यामल तूं तीहि सांवळी मूर्ती
दोघांची एकच कांती
तवहृदयीं उमटे श्यामरूप त्याकाळीं
समरम तूं असशिल झाली
जेव्हां अद्वैतीं प्रेमीं एकच होणें
कैंचें तयिं देणें घेणें!
ध्यानस्थिरता ती अझुनि न विचलित होई
वाटतें मला या ठायीं
येथवरी द्रुतगति येसी गे
विश्रांति या स्थळीं घेसी गे
द्रुत येथुनि पुनरपि जासी गे
पाहत वाट पुढें गंगामाई, तिजसी
ताई तूं भेटायासी २
माझीं परि सारीं ताई माई आई
दिसती वन्सीधर पायीं
जन्मा येवोनी नातें येतें जें जें
सर्वहि तें कृष्णाचि माझें
हृन्मंदिरिं माझ्या राजा कृष्ण विराजे
करि विलास तेथें साजे
सजलें घालुनि मी भक्ति भाव दागीने

त्यालें प्रेमाचें लेणें
हृदयीं मज धरिलें तेणें गे
नातें मी दुसरें नेणें गे
निंदिलें जरी मज कोणें गे
मजला तरि त्याचें काय? वाटतें पाहीं
व्हावें मजसम सर्वांहीं ३

× × × ×

वदसी कां न सये कालिंदी अजुनीही
विटलीस मला कीं तूंही!
करितें मनधरणी केव्हां पासुनि येथं
तुजला का ऐकुं न येतें?
मूळापासोनी चाल वांकुडी जैसी
आहे का मतिही तैसी!
अथवा जगताचा करितो स्वाहा नित्य
पाहतां न पथ्य अपथ्य
त्या कृतांत काळ यमाची गे
अससी तूं भगिनी साची गे
तुज ओळख ना करुणेची गे
मी व्यर्थ किंगे कंठशोष हा केला
तुज मारुनियां हाकेला

---

## ७ वायूशीं-

चाल--( गोपी ह्मणती एकिमेकिला )

[ ती अखेरीस वाऱ्यावरोबर बोलूं लागते! अथवा बोलणें कसलें तें? वाऱ्याशीं मांडतच सुटते ह्मणा ना! ]

सुगंध सुंदर ये कुठला-हा कुठला?

दरवळत वनामधिं सुटला
हा कृष्णाच्या भालींचा—भालींचा
सुवास मृगमद—तिलकाचा
थांब मारुता! थांब इथें—थांब इथें
जाब तुला मी विचारितें
वेणुनाद तूं आणोनी—आणोनी
मघां घातला मम कानीं
कस्तुरि तिलकाचा वास—हा वास
पुनरपि घेउनि आलास!
मघांपासुनी विनवीतें—विनवीतें
श्रीकृष्णाला आळवितें
त्या मम करूणा—वचनांला—वचनांला
ऐकविलेंसी का त्याला?
नातरि एकाच्या नादें—कां नादें
दुसऱ्या दुखवीसी खेदें?
एकाचें कां आयकसी—आयकसी
पक्षपात कां हा करिसी?
करणें अपुल्या कार्याला—कार्याला
सांगितलें कोणी तुजला?
पुरें न हस्तें जरि होत—जरि होत
पडसी कां त्या फंदांत?
कीं ही अपुली जन्माची—कायमची
खोड मधें लुडबुडण्याची?
सळसळुनी कां चळवळसी—चळवळसी
वळुनि वळुनि कां पळपळसी?

काय वदसि? " जें सांगितलें-सांगितलें-
-कार्य तयें तें मी केलें "
तें राहूं दे; हेंच वदें-एक वदें
पूर्वकालिं जी गोष्ट घडे
प्रसाद दशरथ--यज्ञांत-यज्ञांत
उचलुनि, सकलां अज्ञात,
उंच उडोनी गगनांत-गगनांत
घालिसि अंजनि--वदनांत!
सांगितलें कुणि तुजला तें--तुजला तें?
उत्तर दे या प्रश्नातें
आतां कां मुख लपवीसी-लपवीसी?
पुरा जाणतें मी तुजसी!
सांगितलेलें करिसि जरी-करिसि जरी
माझें हें तरि कार्य करीं
माझा करुणारव घेई-रव घेई
कृष्णाच्या श्रवणीं नेई
फुलें जमवुनी वनमाला-वनमाला
गुंफिलि मी श्रीकृष्णाला
नेई तूं त्या मालेचा-मालेचा
वास नासिकीं कृष्णाच्या
सांग तयाला-" जगजेठी-जगजेठी!
तळपे राधा तुजसाठीं "
निघुनि न आतां कां जासी-कां जासी
वेळ उगिच कां घालविसी?

---

## ८ तन्मयता.

### ( १ ) एकीकरण

चाल-( श्रीमंत पतीची राणी )

[ अशाप्रकारें श्रीकृष्ण दर्शनाचा तिला ध्यास लागून ती तन्मय होते. ]

आकाश वरी पसरे हें चहुंकडेहि श्यामल--नील
सकलही तरुलता येथें हरितवर्ण श्यामल नील
त्यापरी शिलातल सारे कृष्णवर्ण श्यामल नील
वाहतसे मंदगतीनें यमुनाजल श्यामल नील
तैसे मयूर कोकील
सर्वहि कुंजवनांतील
जाहलें श्यामल नील
स्वसमान करी तात्काल तो कोठें श्यामल नील ? १
तो एकच श्यामल नील निखिलही जगामधिं भरला
परि जगदुद्धारासाठीं हा वेष मानवी धरिला
घेउनियां मायारूपा गोकुळीं असे अवतरला
बैसला लपोनी कोठें तरि अतां तुह्मां सकलांला
आकाश--वायु भूमाते
जलतेजादिक भूतांतें
ह्या हृदयांतरिं सांठवितें
व्यापका उभारिन आतां एकत्र करुनि व्याप्यांला २

### ( २ ) आत्मार्पण.

नव द्रव्य पंच भूतानों ! अथवा या भोंवति माझ्या
जायांचें जें जमवीलें तें आपुलें घेउनियां जा
घेईन तुह्मां पासोनी पुनरपिही असती गरजा
मज बंधविमुक्त करावें क्षणभरी, करा या काजा

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ४२५६

हें इथें द्रव्य ठेवीलें
अंशभाग असती सगळे
घ्या विभागुनी अपुलाले
बिलगुनी तुह्मां सर्वांतें व्याप्यांत मिसळुनी जातें १

## ९ अंतर्मुखता.

चाल–( वरमाळ माळा घाली । शरमाळ बाळा चाली. )
[ समाधि अवस्थेंत तिची परमेश्वराच्या ठिकाणीं लय लागते. ]

जड देह या वसनातें फेंकुनी अतां मी देतें
शरीरबंधा तटतट तोडुनि मुक्त या क्षणीं होतें
जरि अगाध असतें भंवतें संचारस्थळ विस्तृत तें
तरि ये भरतें आनंदाचें पंजरमुक्त खगातें
पदविहीन गरगर फिरतें शून्यावकाशिं संचरतें
गगनगामि विहगासम वर वर उंच भरारी घेतें
जीवत्वा विसरुनि जातें जीवांतश्वरता घेतें
दृश्य क्षणभर अदृश्य होउनि, अदृश्य मजला दिसतें
वर्तमान भवितव्यातें अस्तित्व नसे भूतातें
कालाच्या नाडीचे ठोके येथें मोजित बसतें
जे जीवन--मणिमालेचे प्राणी मणि असती साचे
सूत्रीं होउनि प्रविष्ट बनती घटकाचि ते सूत्राचे

## १० अस्पष्टाभास.

अनंततेच्या बुरुजावरुनी
तुतारि वाजे फिरफिरुनी !
धुकें पसरलें विरल होउनी
पुनरपि जमतें चहुंकडुनी ! १

## ११ आनंदानुभव.

चाल-( कृत्ना थमाल ले थमाल अपुल्या गाई )

सताड उघडोनी दार मोकळें केलें
कोंदट जागेंत नवीन वारें आलें धृ०
ज्याचा कळत नसे स्पर्श, मला तें भासे
जें अदृश्य, दिसे दृष्टिपुढें आलेंसें
जें कां अकल्प्य तें वेढुनि मज टाकितसे
रुचि मी घेत असें स्वाद परी कळत नसे
अनुभवतें काय माझें मजचि कळेना
बोलूं तरि कैसें कळवाया इतरांना ?

---

## १२ परमानंद.

आनंदाचा पाट फुटे पूर-सुटे धृ०
पावित्र्यानें धुवुनि निघाला
आत्मा अव्यक्तांत मिळाला
व्यक्त जडाचा भास पळाला
' सोऽहं ' शब्द-स्मृति होते-स्मृति होते ! १
' त्वदहं ' तेची विलुप्ति होते
' तत् ' मय सारें दिसूं लागतें
स्त्रीपुरुषत्वाचिये भिन्नते
ठिकाण मिळतें ना येथें-ना येथें ! २
तेजाचा जणुं सागर उसळे
एक दीपिका त्यामधिं मिसळे
स्मृतिही नुरते कथण्या नकळे
' सत्--चित्--आनंदो ' र्मि उठे-ऊर्मि उठे ! ३

---

## १३ श्रीकृष्ण–दर्शन.

चाल ( दोहींकडे भरलि गंगा )

[ इतक्या ध्यास आणि इतकी एकाग्रता झाल्यावर श्रीकृष्ण राधेला दर्शन देतात ]

मनोहर रम्य–दृश्य कुठें गेलें
अद्भुत होतें जें दिसलें
तयाच्या जागीं–श्याम–रूप सगळें
नयनांवरती हें खेळे
स्वप्नमय सारें–वारें जणुं आलें
हृदया हालवुनी गेलें
असें मी कोठें–आकाशीं वरती
अधांतरिं कीं भूमी वरती
करितसें काय–जागी कीं निजलें
फिरतें उठलें कीं बसलें
कळेना कांहीं–दाहि दिशांनांही
कांहीं कृष्णाविण नाहीं
चराचर सारें–श्यामरूप बनलें
जगतीं कृष्णरूप भरलें

× × × ×

मऊ हें काय–मानेच्या खालीं
येथिल शिला कुठें गेली ?
करोनी बघतें–डोळे किलकीले
रुपडें घनश्याम दिसलें
करीं जी माझ्या–होती वनमाला
शोभवि श्रीहरिहृदयाला

कशी ती गेली–मुरलीधर--कंठीं !
मी तर घातली न होती !
जहालें धन्य–धन्य अशा समया
आलें महद्भाग्य उदया.

---

## १४ भेट.

चाल–( त्यजि भक्तासाठीं लाज )

[ उगीच शिणविल्याबद्दल श्रीकृष्ण राधेची समजूत घालतात ]

ऊठ ऊठ ये राधे ! मिळवूं हृदय हृदयाला धृ०
संकेत तुजसि करुनी बैसलों इथें लपुनी
मनिं हेतु हाच धरुनी तव अंत गे बघण्याला १
निज भक्तिबलें करुनी तूं काढिसि शोधोनी
नाढळे कुठें भुवनीं मज ठाव गे लपण्याला २
प्रेम भक्ति हीं दोन्ही प्रिय मज हें ओळखुनी
तुजसम मम भजकांनीं मज दास खासाचि केला ३
प्रेमा तव मज कळला शिणविलें उगिच तुजला
तुजसम भाविक विरळा अति मोद मानसिं झाला ४

---

## १५ विज्ञापना.

चाल–( परदेसी सैंया )

[ राधेची श्रीकृष्णास विनंति. ]

मन माझें तुझिया वदनसरोजीं
भ्रमरीपरी भ्रमणा करी धृ०
येथुनि तरि पुढती आतां
देइं न अंतर भगवंता

मुखवीसी साधूसंतां
लपसि मज कां
कसलि शंका
उठते तरी वरचे वरी १
नट नाटकि सूत्रधारा
मायावेषी जादुगारा
देउनी हृदयीं मज थारा
मग जगा या
भारुनीयां
टाकीं हरी लीला करीं २
रतलें तव भाव-सुसंगीं
रोमांचित अंगीं अंगीं
करिं अधरींची मज पुंगी
गग मुरारे
गारुड्या रे
चालू करीं जादू--गिरी ३

---

## १६ आज्ञापना

चाल-[ तू. टाक चिरुनि ही मान )
[ श्रीकृष्णाचा राधेस उपदेश ]

मज आठवुनी हृदयीं सदा राहीं
कर्तव्यकर्म संसारिं कराया विन्मुखी न होईं धृ०
गृह सोडुनि काननिं जाणें,
भस्मानुलेपना करणें
नख जटाजूट वाढविणें

[library stamp, illegible]

हें नलगे कांहीं चित्त ठेवितां नित्यहि मम पायीं १
पतिसेवातत्पर व्हावें
वडिलांचें वच ऐकावें
उपकारीं दक्ष असावें
वाईट बरें वा स्वकार्य करितां मजला तें वाहीं २
सत्तत्त्व तुला कळलें हें
परि कर्तव्य न सोडावें
संसारीं साह्य करावें
सासू श्वशुरांना पतिपुत्रांना; मजला मनिं ध्यायीं ३
आपणास कांहीं ठावें
तें अज्ञांनां शिकवावें
गर्वा न मनीं वाहावें
व्रजभानुकन्यके ! धन्य राधिके होशिल तूं पाहीं ४

---

## १७ अनुमति

[ श्रीकृष्णाच्या आज्ञेस राधेचें नम्र उत्तर ]

जयिं अंतर्मुखता होते
तेव्हां तुजपाशीं येतें
नित्यही पतीसवेतें
मी तत्पर असतें जनां न कळतें टोंचिति शल्यांहीं ५
गोप बालिका सखियांना
पतिपितादिकां इतरांना
करवोनी तव गुणगाना
नमवीन तुझ्या चरणीं झणिं आणुनि मी विविध उपायीं ६

---

## १८ उद्बोधन

चाल-( सबसे रामभजन कर लेना )

[ राधेचा जनतेस संदेश ]

मी प्रेमनगरराहिवासी बनलें श्रीहरि सहवासीं ध्रु०
ह्या नगरींची विचित्र रीती इतरत्र न दिसते
मी सम्राज्ञी, प्रजा बंदिजन मी, अन्य न वसतें । बनलें १
प्रवेश केला ह्या नगरांतरिं द्वार खुलें करितें
या रे जमुनी करिं कर धरुनी आंत तुह्मां घेतें । बनलें २
मात्र सांगतें कलह न करणें ह्मणुनि " तुझें माझें "
भिन्न भावना मनांत धरितां झांकिन दरवाजे । बनलें ३
भेद पाडुनी कलह करोनी सत्यनाश झाला
दिसत नसे का स्पष्ट, अज्ञानि कां मिटितां नयनांला ? बनलें ४

**श्रीकृष्णार्पणमस्तु.**


**श्रीयुत वि. कृ. नेरूरकर यांचा**

**समग्र कविता-संग्रह.**

लवकरच छापून तयार होईल.

प्रमोद ऑफिस सावंतवाडी या पत्त्यावर आगाऊ नांवें नोंदविणारास टपाल खर्च माफ.

ॐ

वर्गणीदार व्हा ] **कृष्णं वंदे जगद्गुरुम्** [ वर्गणीदार व्हा

प्रसिद्ध, अप्रसिद्ध अशा २० टीकांसह १६ भागांत प्रसिद्ध होणारी

पद्य संख्या २००००० ] **श्रीमद्भगवद्गीता** [ आकार रायल ८ पेजी

**पहिला भाग येत्या विजयादशमीस प्रसिद्ध होईल.**

**टीकाकारांचीं नांवें.**

**प्रकाशित**-१ ज्ञानेश्वर, २ सोपानदेव, ३ मुक्तेश्वर, ४ वामन, (यथार्थदीपिका,) ५ वामन (शांडिल्य), ६ रंगनाथ मोगरेकर, ७ रमावल्लभदास, ८-९ मोरोपंत (२), १० तुकाराम (विप्र), ११ उद्धवचिद्धन.

**अप्रकाशित**-१ दासोपंत (गीतार्णव), २ दासोपंत, (गीतार्थबोधचंद्रिका), ३ माधव नारायणदास, ४ माधव, (तंजावर प्रत), ५ अच्युताश्रम, ६ निवृत्तिदेव, ७ वामन (द्विजोत्तम), ८ रत्नाकर, ९ हरिपंडित, १० यादव प्रभाकर वटक-अशा उत्तमोत्तम टीकांचा संग्रह-१४ भाग, पंधराव्या भागांत इतर गीता, उपसंहार आणि गीतेविषयींची शक्य ती माहिती; व सोळावा भाग गीताकोश. दर ३ महिन्यास १ भाग याप्रमाणें सरासरी ४ वर्षांत सबंध ग्रंथ प्रसिद्ध होईल. शतकांतून एकादेवेळींच प्रसिद्ध होणाऱ्या असल्या राष्ट्रीय ग्रंथास प्रत्येकानें संग्रहीत करावे. जास्त माहितीकरितां १ आण्याचें तिकीट पाठवून नमुना पत्रक मागवा.

प्रकाशकः-**रा. स्वा. नाईक, बी. ए.**

**१६९३ बोगारवेस, (बेळगांव.)**

# " किण किण कंकण-नाद ! "

हातांतल्या बांगड्यां करितां दरवर्षी परदेशांत लाखों रुपये हिंदुस्तानांतून जातात, ते देशांतले देशांतच ठेवा ना?

## पूर्ण स्वदेशी बांगड्या

एकाच नगांत २।३ रंग असलेल्या, आंतील व बाहेरील पिळाच्या बिल्वर, पैलूच्या, साध्या गोल वगैरे १०० तऱ्हांच्या टिकाऊ, मोहक बांगड्या आमचेकडे मिळतात. विलायती पेक्षां सर्व गुणीं श्रेष्ठ.

१२ प्रकारच्या १२ जोड्यांस १।-, ३६ जोड्यांस ३ रु. ट. खर्च माफ. नमुन्यांसाठीं ८ आण्याचीं. तिकिटें पाठवा.

मे. भागवत आणि कंपनी, शाहुपुरी कोल्हापूर

---

# " ती खूष झाली ! "

आमचे दुकानांतून दागिना घेऊन घरीं नेल्यावर परत येऊन सांगाल कीं " ती खूष झाली " अशी आह्मी खात्री देतों.

आमचेकडून दागिना घरीं नेल्यावर घरांतून असा ध्वनि तुह्मांला ऐकूं येईल कीं, " आमच्या पुरुषांस दागदागिन्याची चांगली पारख आहे हो ! " डोकावून पहाल तर बऱ्याच शेजारणींला उद्देशून हे शब्द काढलेले आढळून येतील.

आमचेकडे सर्व प्रकारचे सोन्या चांदीचे व हिऱ्यामोत्यांचे दागिने, चांदीचीं भांडीं वगैरे माल योग्य भावानें विकत अगर तयारही करून देऊं परगांवी व्ही. पी. नें. पाठऊं.

विश्वनाथ संभाजी हळदणकर अँड ब्रदर्स सराफ

गणपतगल्ली बेळगांव.

REFBK-0004256
REFBK-0004256

# सांग कसें हंसलों ?

ऐकलें पहिल्या दिवशीं,
माहित नव्हतें कधीं कुणाशीं,
विचार येतां त्या समयासी,
मनांत मी हंसलों ॥ १ ॥

तसाच घरिं मी धांवत आलों,
आई जवळी रुसून बसलों,
एक पावली घेउन आलों,
खुद्कन् मीं हंसलों ॥ २ ॥

विकणारा तो जवळच होता,
'चमन' चिमुटभर मुखीं टाकतां,
आंबट गोड खमंग लागतां,
आनंदें हंसलों ॥ ३ ॥

सुवास त्याचा मधूर येई,
जिवा विसावा बहुताचि देई,
दिवस मजेनें जातां कांहीं,
हँ हँ हँ हंसलों ॥ ४ ॥

निरोगि होई सेवन करितां,
वाइट वाटे 'चमन' संपतां,
'चमन' आकस्मिक हातीं पडतां,
सांग कसें हंसलों ॥ ५ ॥

## असें कोणास वाटत नाहीं ???

शरीर प्रकृती निकोप असावी, खाल्लेलें अन्न पचन होऊन भूक लागावी, वात, पित्त, चक्कर येणें वगैरे विकार होऊं नयेत, तोंडाची दुर्गंधी येऊं नये, कफ, खोकला, अरुची, थंडी, दमा, श्वास आणि कोणत्याही गांवचे पाणी बाधूं नये! असें सर्वांस वाटतें ना? मग चमनची जाहिरात जरूर वाचा आणि मागवा. (सूचना ३१ पानावर जाहिरात आहे.)